# प्रेस नोट दिनांक २६/६/२०१८

कोथरुड पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्रात दिनांक २०/६/२०१८ रोजी रात्रौ ०१/०० वा. डुक्कर खिंडीजवळ एका बँक प्रबंधक नामे अलोक सोपान अभंग रा. सी-२५ अमेय आर्केड, महात्मा सोसायटी जवळ कोथरूड पुणे यांना चार अनोळखी इसमांनी दगडाने मारहान करुन मोबाईल व रोख रक्कम लुटली होती, तर दिनांक २२/६/२०१८ रोजी सकाळी ०८/३० वा. त्याच ठिकाणी मॉर्निंग वॉकला गेलेली महिला नामे सौ.रिता गणेश खैरनार वय ३३ वर्ष रा. डब्लु ५०२ वंडर फयुचरा कोथरूड पुणे यांचे मंगळसुत्र चोरट्यांनी जबरदस्तीने खेचुन नेले होते. या एकाच ठिकाणी लागोपाठ घडलेल्या दोन जबरी चोरीच्या गुन्हयांचा तपास सर्व बाजुंने चालू असतांना कोथरुड पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोलीस उप निरीक्षक वाघमारे यांना मिळालेल्या गुप्त माहितीवर उप निरीक्षक वाघमारे, उप निरीक्षक जाखडे , स पो फौ दत्ता शिंदे, पो ना कुदळे, पो शि हगवणे, निकाळजे, बडगे व शेवाळे यांनी तपास करुन वरील जबरी चोरी करणारे आरोपीं

१. लक्ष्मण येडबा शेंडगे वय १८ वर्ष रा. म्हाडा सोसायटी सी बिल्डींग रुम नं १०८ वारजे पुणे.
२.शुभम उर्फ भावडया नागेश तिसरबुडे वय २२ वर्षे रा. म्हाडा सोसायटी सी बिल्डींग रुम नं ११५ वारजे पुणे
३.अनिकेत राजु देशपांडे वय १८ रा. म्हाडा सोसायटी आय बिल्डींग रुम नं २०७ वारजे पुणे
४.अनिकेत संतोष पुलावळे वय १७ रा. म्हाडा सोसायटी सी बिल्डींग रुम नं २१५ वारजे पुणे

यांना शिताफीने दिनांक २५/६/२०१८ रोजी पकडुन त्यांना अटक केलेली आहे. त्यांचेकडुन त्यांनी कोथरुड पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्रात केलेले खालील प्रमाणे नमुद गुन्हे उघडकीस आणलेले आहेत.

१. कोथरुड पो स्टे गु र नं १७५/२०१८ भा दं वि क ३९२ – चेन स्नॅचिंग
२. कोथरुड पो स्टे गु र नं १७३२२०१८ भा दं वि क ३९४, ३४१, ५०४, ३४ – जबरी चोरी
३. कोथरुड पो स्टे गु र नं ४०/२०१८ भा दं वि क ३९२, ३४ – चेन स्नॅचिंग
४. कोथरुड पो स्टे गु र नं १३/२०१८ भा दं वि क ३७९ – चोरी
५. कोथरुड पो स्टे गु र नं ९६/२०१८ भा दं वि क ३७९, ५११ – चोरीचा प्रयत्न

त्यांची पोलीस कोठडीची अभिरक्षा घेवून त्यांचेकडे अधिक तपास चालु आहे. त्यांचेकडे केले प्राथमिक तपासामध्ये सदरचे आरोपी हे कात्रज देहुरोड बायपासचे दोन्ही बाजुस गुन्हे केल्याचे सांगत आहेत. सदरची कार्यवाही मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग श्री रविंद्र सेनगावकर, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ , श्री बसवराज तेली, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त डेक्कन विभाग श्री बाजीराव मोहिते, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री अप्पासाहेब शेवाळे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शंकर खटके, पोलीस उप निरीक्षक वाघमारे, पोलीस उप निरींक्षक जाखडे , स पो फौ दत्ता शिंदे, पो ना कुदळे, पो शि हगवणे, निकाळजे, बडगे व शेवाळे यांनी केलेली आहे. अटक आरोपींकडे अधिक तपास चालू आहे.